**नियमित दिवाणी दावा क्र. १३१/२०२०**

(शिवम यलमार वि. आनंद यलमार)

**CNR No. MHSO07-000158-2020**

**<u>निशाणी क्र.११३ व ११६ वरील एकत्रित आदेश</u>**

निशाणी क्र.११३ कडील अर्ज वादीने नि.क्र.१०९ व ११० वर पारित झालेल्या आदेशाचे पुनर्विलोकन होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र.११६ कडील अर्ज एकतर्फा आदेश रद्द होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. निशाणी क्र. ११३ कडील अर्जामध्ये वादीचे असे कथन आहे की, निशाणी क्र.१०९ कडील अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी कैफियत सादर करणेस झालेला विलंब माफ करून मिळणेकरता व निशाणी क्र.११० कडील अर्ज विनाकैफियत आदेश रद्द होऊन मिळणेकरिता सादर केला होता. वास्तविकपणे प्रतिवादी क्र.२ यांच्याविरूध्द दिनांक ०६.०१.२०२६ रोजी एकतर्फा आदेश पारित झालेला होता. असे असताना प्रतिवादीने एकतर्फा आदेश रद्द करण्याऐवजी चुकीच्या पध्दतीने अर्ज देऊन विना कैफियत आदेश रद्द करून घेतलेला आहे. सदरचा आदेश पुनर्विलोकीत करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.२ यांनी त्यानंतर निशाणी ११६ कडे एकतर्फा आदेश रद्द होऊन मिळावा म्हणून अर्ज सादर केला आहे. तसेच निशाणी ११९ कडे एकतर्फा आदेश रद्द होऊन मिळणेकरता अर्ज दाखल केला आहे. वादीने निशाणी ११८ कडे प्रतिवादी क्र.२ यांच्या निशाणी ११६ कडील अर्जास म्हणणे दाखल केल आहे.

४. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे

अवलोकन केले. निशाणी १ चे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ याच्याविरूध्द दिनांक ०६.०१.२०२६ रोजी एकतर्फा आदेश पारित झाल्याचे दिसून येते. असे असताना प्रतिवादी क्र.२ यांनी निशाणी १०९ कडे दिनांक १३.०३.२०२६ रोजी प्रतिवादींच्या विरूध्द ज्यादा कैफियत नाही हा आदेश रद्द करून मिळणेकरता अर्ज सादर केला. परंतु त्यांनी त्याच्या विरूध्द पारित झालेला एकतर्फा आदेश रद्द करून मागितला नाही. निशाणी १०९ व निशाणी ११० या आदेशामध्ये कोठेही तांत्रिक चुक नाही. त्यामुळे सदर आदेशाचे पुनर्विलोकन करणे गरजेचे नाही.

५. दिनांक ०६.०१.२०२६ रोजी प्रतिवादी क्र.२ दाव्यात हजर नसल्यामुळे एकतर्फा आदेश पारित केला होता. सदरचा आदेश रद्द करून घेणेकरिता प्रतिवादी क्र.२ यांनी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी कागदपत्रे गोळा करणे वकिलांची भेट घेणे शक्य झाले नाही असे कथन केले आहे. सदर अर्जातील मजकूर वादीनी नाकारला आहे व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटपाचा दावा प्रलंबित आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी व प्रतिवादीची बाजू ऐकून घेणे गरजेचे आहे. दोन्ही पक्षकारांना समान संधी दिल्यामुळे कोणाचेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादीस संधी न दिल्यास सदर दाव्याचा निकाल गुणावगुणावर होणार नाही. नैसर्गिक न्याय तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी निशाणी ११६ कडे दाखल केलेला अज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

# आदेश

| | |
|---|---|
| १. | वादी यांनी नि.क्र.११३ कडे दाखल केलेला अर्ज नामंजूर करण्यात येते. |
| २. | प्रतिवादी यांनी नि.क्र.११६ कडे दाखल केलेला अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| ३. | प्रतिवादी यांचेविरूध्द पारित झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येत आहे. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.05.08 17:46:30 +0530

(पी. आर. पाटील)

दिनांकः– ०८.०५.२०२६ ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. A. Lagale |
| Court | - | $5^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 08.05.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 08.05.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 08.05.2026 |